महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४
दूरध्वनी क्र.२७५७१५१७/२७५७८००३, फॅक्स् क्र.२७५७१५१६.
ई-मेल: rbkonkan@gmail.com / konkandcr@gmail.com

---

जा.क्र./ल. ले/कां.स/ 05 /सन 2023-24
फोर्ट, मुंबई – 400 001 दिनांक:- 12.7.23

प्रिय श्री ...

**विषय** :- श्री. धीरज परब व श्री. अमजद खान यांच्या तक्रारी निकाली काढण्याबाबत.
**संदर्भ** :- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.30.06.2023 रोजीच्या 22 व्या बैठकीतील निर्देश.

विषयांकित प्रकरणी मी आपले लक्ष कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.30.06.2023 रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशांकडे वेधू इच्छितो. श्री. धिरज परब (7 तक्रारी) व श्री. अमजद खान (135 तक्रारी) यांच्या तक्रारींबाबत निम्नस्वाक्षरीकर्ते यांनी आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका यांना जिल्हाधिकारी यांचे समवेत आठ दिवसात बैठक घेऊन सदर तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करणेबाबत दि.16.05.2023 रोजीच्या बैठकीत निर्देश दिले होते. तथापि, याबाबत आपले स्तरावरुन उपरोक्त नमूद तक्रारींबाबत आवश्यक ती कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तरी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी कांदळवनांच्या संवर्धन व संरक्षणाबाबत दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करुन तद्संबंधी होत असलेल्या कायदेशीर उल्लंघनाबाबत ठोस उपाययोजना करुन स्वयंस्पष्ट वस्तूस्थितीदर्शक अहवाल तात्काळ सादर करावा.

**मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या जनहित याचिका क्र. 87/2006 च्या अनुषंगाने कांदळवन संवर्धनासंबंधी दिलेल्या आदेशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी व प्राप्त होणाऱ्या तक्रारी या जनमानसातून/स्वयंसेवी संस्था तसेच लोकप्रतिनिधींकडून प्राप्त होत असल्याने यात प्राधान्यपूर्वक कार्यवाही अपेक्षित आहे.**

आपला,

Mannya

अध्यक्ष
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग

प्रति,
श्री. दिलीप ढोले,
आयुक्त, मिरा-भाईदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.

प्रतिलिपी : 1. सह अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहितीसाठी.
2. सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.